# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०२०/प्र.क्र.०९/ का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८ नोव्हेंबर, २०२१

प्रति,
जिल्हाधिकारी,
भंडारा व गोंदिया

**विषय :-** भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत
१५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका-२०२०
सुधारीत आरक्षण सोडत कार्यक्रम.

**संदर्भ :-** १) आयोगाचे समक्रमांकाचे दि.१४ फेब्रुवारी, २०२० चे आदेश
२) आयोगाचे समक्रमांकाचे दि. ०३ नोव्हेंबर, २०२० चे पत्र.
३) मा. सर्वोच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.९८०/२०१९ व इतर संलग्न याचिकेमधील दि.०४ मार्च,२०२१ चा निर्णय
४) राज्य शासन, महाराष्ट्र अध्यादेश क्र.३/२०२१, दि. २३ सप्टेंबर,२०२१.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भांकित अ.क्र.१ व २ समोरील पत्रान्वये आपल्या जिल्हयातील जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रमानुसार अंतिम प्रभाग रचना व आरक्षण दि.०२/१२/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच दि. ०२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमानुसार दि.१०/०३/२०२१ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली. तथापि, राज्य शासनाचे दि.०४/०६/२०२१ व ११/०८/२०२१

रोजीचे ब्रेक द चेन मधील निवडणूकविषयक निर्बंधामुळे प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली नाही.

२. दरम्यानच्या काळात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र. ९८०/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०४/०३/२०२१ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट पिटीशन (सिव्हील) क्र. ३५६/१९९४ श्री. डॉ. के कृष्णमूर्ती विरुध्द केंद्र शासन यामध्ये दि. ११ मे, २०१० रोजी दिलेल्या निवाडयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० % च्या मर्यादेत आरक्षण देण्याचे निदेश दिले आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १२ (२) (क) मधील तरतूद त्यानुसार बदलली (read down केली.)

३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासनाने दि.२९ जून, २०२१ रोजी मागासवर्ग आयोग गठीत केला आहे. तसेच राज्य शासनाने दि.२३ सप्टेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ सन २०२१ प्रख्यापित केला असून सदरच्या अध्यादेशान्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १२ मध्ये पोटकलम (२)चा खंड (ग) आणि कलम ५८, पोटकलम (१ब) चा खंड (क) मध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तीसाठी राखून ठेवावयाच्या जागा, जिल्हा परिषद/ पंचायत समितीमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्के पर्यंत असतील आणि एकूण आरक्षण जिल्हा परिषद / पंचायत समितीमधील एकूण जागांच्या ५० टक्के पेक्षा अधिक असणार नाही, अशी सुधारणा केली आहे.

४. सद्यस्थितीत भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया पुर्ण झालेली नसल्याने राज्य शासनाने दि.२३/०९/२०२१ रोजी जारी केलेल्या अध्यादेशातील तरतुदीनुसार सदर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील

नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी तसेच आरक्षित ठेवावयाच्या जागा एकूण ५० % च्या मर्यादेत राहणे आवश्यक आहे.

५. सद्यस्थितीत अधिनियमातील तरतुदीनुसार भंडारा व गोंदिया जिल्हा परिषदांमधील राखीव जागांवरील आरक्षण ५०% च्या मर्यादेत सिमीत राखताना नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील राखीव जागांची संख्या अनुक्रमे १ व ४ ने अधिक होत आहे.

तसेच भंडारा जिल्हा परिषदेअंतर्गत पवनी पंचायत समितीमध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची संख्या १ ने आणि गोंदिया जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समिती सालेकसा-१, सडक अर्जुनी-१, अर्जुनी मोरगाव-२ व देवरी-३ ने अधिक होत आहेत.

६. तरी उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे भंडारा व गोंदिया जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समितीमधील जेथे ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात आहे, अशा बाबतीत जिल्हा परिषद/पंचायत समितीमधील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण महिलांकरिता पुन्हा आरक्षण सोडत काढण्यासाठी परिशिष्ट-१ मध्ये कार्यक्रम देण्यात येत आहे.

तथापि, मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दाखल रिट याचिका क्र.११७४४/२०२१ द्वारे राज्य शासनाने दि.२३/०९/२०२१ रोजी पारीत केलेला महाराष्ट्र अध्यादेश क्र.३/२०२१ ला आव्हान देण्यात आले आहे. या याचिकेतील दि.२२/१०/२०२१ रोजीच्या अंतरीम आदेशान्वये सदर याचिका प्रलंबित असताना आयोगातर्फे करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही या याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहील, असे मा. न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

७. सदर आरक्षणाची सोडत काढताना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती (जागांच्या आरक्षणाची पध्दती व चक्रानुक्रमे फिरविणे) नियम, १९९६ मधील तरतुदीनुसार व आयोगाचे आदेश दि.०४/१०/२०११ व दि.१२/०३/२०२० मधील नमूद प्राधान्यक्रमानुसार जागा आरक्षित करण्यात येतात.

८. जिल्हा परिषदांच्या बाबतीत जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समितींच्या बाबतीत तालुक्याच्या मुख्यालयी संबंधित तहसिलदाराकडून सोडत काढण्यात यावी.

९. तालुका मुख्यालयात काढण्यात येणाऱ्या सोडतीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समित्यांकरिता एक उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक करावी.

१०. सोडतीसाठी पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ x१५ से.मी.पेक्षा जास्त नसावा. त्यावर लावण्यात येणारे रबर बँण्ड एकाच रंगाचे असावेत.

११. सोडतीसंबंधीच्या सूचनेस जिल्हास्तर व तालुकास्तरावर नेमून दिलेल्या दिनांकास मोठया प्रमाणात प्रसिध्दी दयावी. उदा.-

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टि.व्ही.वर
(b) जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील सूचना फलक
(c) जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयातील सूचना फलक
(d) जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर, इत्यादी

१२. सोडतीचा कार्यक्रम राबविताना कोविड-१९ या साथीच्या आजाराच्या अनुषंगाने घ्यावयाची खबरदारी म्हणून पुढील नमूद उपाययोजना अवलंबून पूर्ण करता येईल. जसे की-

(१) सर्वांच्या बैठकीची व्यवस्था पुरेसे अंतर ठेवून करणे.
(२) मास्क वापरणे
(३) सामाजिक अंतर ठेवणे
(४) सॅनिटायझरचा वापर करणे
(५) आवश्यकतेनुसार थर्मल स्क्रिनिंग करणे

तसेच केंद्र व राज्य शासनाने कोविड-१९ च्या अनुषंगाने वेळोवळी जाहीर केलेल्या विविध उपाययोजना व दक्षता घेण्याबाबत दिलेल्या सूचनांचे योग्य ते पालन करावे.

१३. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदा व संबंधित पंचायत समितीमधील आरक्षणाची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व सदर अधिसूचनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. स्थानिक वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद व तहसिल कार्यालयाचे सूचना फलक, वेबसाईट इत्यादी ) तसेच सदर अधिसूचनेच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र - परिशिष्ट-१

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
२) विभागीय आयुक्त, नागपूर

D:\BHANDARA & GONDIYA\note for revise wf prog.cr 09 2020 _ 03112021.docx

१३. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदा व संबंधित पंचायत समितीमधील आरक्षणाची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व सदर अधिसूचनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. स्थानिक वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद व तहसिल कार्यालयाचे सूचना फलक, वेबसाईट इत्यादी ) तसेच सदर अधिसूचनेच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र - परिशिष्ट-१

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
२) विभागीय आयुक्त, नागपूर

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०२०/प्र.क्र.०९/का.७, दि.०८/११/२०२१ सोबतचे सहपत्र)

भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा तसेच भंडारा जिल्हा परिषदे अंतर्गत पवनी पंचायत समिती व गोंदिया जिल्हा परिषदे अंतर्गत सालेकसा, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, देवरी या ४ पंचायत समित्यांमधील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला आरक्षणाची सोडत काढणे बाबत

सुधारीत कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच महिला (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण) आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १०/११/२०२१ |
| २ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच महिला (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण) आरक्षण सोडत काढणे | | १२/११/२०२१ |
| | अ) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी | संबंधित तहसिलदार | |
| ३ | अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १५/११/२०२१ |

टिप :- जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## प्रपत्र - 1

## भंडारा जिल्हा परिषदेत अनुज्ञेय ठरत असलेल्या निवडणूक विभागांच्या संख्येबाबतचा तपशील (सुधारीत)

| SR. NO. | DISTRICT | TOTAL POPULATION AS PER CENSUS POPULATION 2011 | RATIO 114819 (DECIMAL) | CENSUS POPULATION 2011 | | | Z.P. SEATS | TOTAL WOMAN | DETAILS REGARDING RESERVATION | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | GEN | | SC | | ST | | BCC | |
| | | | | TOTAL | SC | ST | | | T | W | T | W | T | W | T | W |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 1 | Bhandara (As per Govt. Ordinance dt.23/09/2021) | 982509 | 2.126 | 982509 | 164062 | 77997 | 52 | 26 | 26 | 12 | 9 | 5 | 4 | 2 | 13 | 7 |

## प्रपत्र-२

### भंडारा जिल्हा परिषदेतील अनुज्ञेय जागांचा पंचायत समिती क्षेत्रनिहाय तपशिल तसेच पंचायत समित्यांना अनुज्ञेय ठरत असलेल्या जागांच्या सुधारीत तपशील (आरक्षणासह)

| SR. NO. | DISTRICT | PANCHAYAT SAMITI | CENSUS POPULATION 2011 | | | DECIMAL | ADMISSIBLE SEATS | | TOTAL WOMEN | Reservation | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | TOTAL | SC | ST | | ZP | PS | | GEN | | SC | | ST | | BCC | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | BHANDARA (As per Govt. Ordinance dt.23/09/2021) | PAUNI | 131324 | 27669 | 9238 | 6.95 | 7 | 14 | 7 | 7 | 3 | 3 | 2 | 1 | 0 | 3 | 2 |

प्रपत्र - 1

## गोंदिया जिल्हा परिषदेत अनुज्ञेय ठरत असलेल्या निवडणूक विभागांच्या संख्येबाबतचा तपशील

| SR. NO. | DISTRICT | TOTAL POPULATION AS PER CENSUS POPULATION 2011 | RATIO 114819 (DECIMAL) | CENSUS POPULATION 2011 | | | Z.P. SEATS | TOTAL WOMAN | DETAILS REGARDING RESERVATION | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | GEN | | SC | | ST | | BCC | |
| | | | | TOTAL | SC | ST | | | T | W | T | W | T | W | T | W |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 2 | GONDIA As per Govt. Ordinance dt.23/09/2021 | 1082270 | 2.99 | 1082270 | 132088 | 198175 | **53** | **27** | **27** | **14** | **6** | **3** | **10** | **5** | **10** | **5** |

प्रपत्र-2

## गोंदिया जिल्हा परिषदेतील अनुज्ञेय जागांचा पंचायत समिती क्षेत्रनिहाय तपशिल तसेच पंचायत समित्यांना अनुज्ञेय ठरत असलेल्या जागांच्या तपशील (आरक्षणासह)

| SR. NO. | DISTRICT | PANCHAYAT SAMITI | CENSUS POPULATION 2011 | | | DECIMAL | ADMISSIBLE SEATS | | TOTAL WOMEN | Reservation | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | GEN | | SC | | ST | | BCC | |
| | | | TOTAL | SC | ST | | ZP | PS | | T | W | T | W | T | W | T | W |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | GONDIYA | SALEKSA | 81792 | 5620 | 21477 | 4.005 | 4 | 8 | 4 | **4** | **2*** | **1** | **1** | **2** | **1** | **1** | * |
| 2 | GONDIYA | SADAK ARJUNI | 109619 | 15543 | 23159 | 5.368 | 5 | 10 | 5 | **5** | **2** | **1** | **1** | **2** | **1** | **2** | **1** |
| 3 | GONDIYA | ARJUNI MORGAON | 138793 | 24604 | 32174 | 6.797 | 7 | 14 | 7 | 7 | 3 | 2 | 1 | 3 | 2 | 2 | 1 |
| 4 | GONDIYA | DEVRI | 99939 | 11017 | 52944 | 4.894 | 5 | 10 | 5 | **4** | **1** | **1** | **1** | **5** | **3** | **0** | **0** |

* सालेकसा पंचायत समितीमध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी एकच जागा आरक्षित होत असून ती नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) करिता आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीद्वारे ठरवावे लागेल. सोडतीमध्ये सदर जागा ना.मा.प्र (स्त्री) साठी आरक्षित झाल्यास सर्वसाधारण (स्त्री) साठीची जागा एकने कमी होईल.